सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस अधीक्षक कार्यालय सोलापूर ग्रामीण
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर
दुरध्वनी क्रमांक:- ०२१७-२७३२००१.
EmailID sp.solapur.r@mahapolice.gov.in

क्रमांक:-आस्था-१/पो.भरती/२०२१/२०२२- सोलापूर ग्रा. दिनांक -३१/१२/२०२२

# प्रेसनेट

सोलापूर ग्रामीण पोलीस दलाची चालक पोलीस शिपाई व पोलीस शिपाई भरती प्रक्रिया २०२१ ही दि.०२/०१/२०२३ चे पहाटे ५.०० वाजलेपासून पोलीस मुख्यालय,सोलापूर ग्रामीण येथे सुरु होत आहे. सदर भरती प्रक्रियेकरीता येणारे उमेदवारांकरीता खालीलप्रमाणे महत्वाच्या सुचना देण्यात येत आहे.

१. भरती करीता आवश्यक असलेले प्रवेशपत्र सर्व संबधित उमेदवारांना महाआयटी कडून त्यांचे ई-मेल वर पाठविण्यात आलेले आहे.सदर प्रवेशपत्र उमेदवारांकडे असणे अनिवार्य आहे. प्रवेशाचे वेळी सदरचे प्रवेशपत्र नसल्यास सदर उमेदवारास भरती प्रक्रियेकरीता प्रवेश दिला जाणार नाही.

२. उमेदवाराने महाआयटी कडून देण्यात आलेल्या प्रवेशपत्रावरील सुचनांनुसार विहित वेळेमध्ये पोलीस मुख्यालय,सोलापूर ग्रामीण येथे उपस्थित रहावयाचे आहे. येताना स्वत:चे ५ फोटो,शैक्षणिक अर्हता कागदपत्रे,जातीचे प्रमाणपत्र/जात पडताळणी प्रमाणपत्र,वाहन चालविण्याचा वैध परवाना,नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र तसेच इतर आवश्यक असलेली सर्व विहित कालमर्यादेत कागदपत्रे सोबत आणावयाची आहेत.एकदा प्रवेश केल्यानंतर कोणत्याही कारणास्तव उमेदवारास बाहेर जाता येणार नाही.

३. उमेदवारांनी त्यांचे भ्रमणध्वनी, इलेक्ट्रिक डिवाईस, स्मार्ट वॉच,स्पोर्ट वॉच,हेडफोन,ब्ल्यूटुथ, गळयात धागे,दोरे गळयात कोणत्याही प्रकारचे इलेक्ट्रिक उपकरणे इ.आक्षेपाहर्य वस्तु प्रवेशाचे वेळी सोबत आणू नयेत, तसे केल्याचे आढळल्यास त्यास भरती प्रक्रियेतून बाहेर काढण्यात येईल. तसेच कोणत्याही मौल्यवान वस्तु स्वत:जवळ बाळगू नये अशा वस्तु गहाळ झाल्यास त्यास ते स्वत: जबाबदार राहतील.

( राजेंद्र टाकणे )
पोलीस निरीक्षक तथा
प्र.पोलीस उपअधीक्षक (मुख्यालय)
सोलापूर ग्रामीण.